# शिवाजी विद्यापीठ प्रशासकीय कर्मचारी कल्याण निधी योजना

## परिपत्रक

शिवाजी विद्यापीठ प्रशासकीय कर्मचारी कल्याण निधी योजनेच्या सभासदांना कळविण्यात येते की, सन २०२१-२०२२ या शैक्षणिक वर्षामध्ये परीक्षा दिलेल्या सभासद व सभासदांच्या पाल्यांना त्यांनी मिळविलेल्या गुणवत्तेनुसार व परीक्षेनुसार विद्यापीठ वर्धापन दिनादिवशी (दिनांक १८ नोव्हेंबर, २०२२) कल्याण निधी घटना कलम १४ (२ व ३) नुसार बक्षीसे देण्यात येतील. त्याचा तपशील खालीलप्रमाणे.

| | |
|---|---|
| गट क्र. १ पदवी/ पदव्युत्तर | प्रथम प्रयत्नात उत्तीर्ण झालेल्या व गुणानुक्रमे सर्वप्रथम येणाऱ्या वर्ग १ ते ३मधील सभासदांच्या तीन पाल्यांना अनुक्रमे रूपये २०००, १५००, १००० अशी बक्षिसे देण्यात येतील. |
| गट क्र. २ पदवी / पदव्युत्तर | प्रथम प्रयत्नात उत्तीर्ण झालेल्या व गुणानुक्रमे सर्वप्रथम येणाऱ्या वर्ग ४ मधील सभासदांच्या तीन पाल्यांना अनुक्रमे रूपये २०००, १५००, १००० अशी बक्षिसे देण्यात येतील. |
| गट क्र. ३ - १२ वी (H.S.C.) | प्रथम प्रयत्नात उत्तीर्ण झालेल्या व गुणानुक्रमे सर्वप्रथम येणाऱ्या वर्ग १ ते ३ मधील सभासदांच्या तीन पाल्यांना अनुक्रमे रूपये २०००, १५००, १००० अशी बक्षिसे देण्यात येतील. |
| गट क्र. ४ - १२ वी (H.S.C.) | प्रथम प्रयत्नात उत्तीर्ण झालेल्या व गुणानुक्रमे सर्वप्रथम येणाऱ्या वर्ग ४ मधील सभासदांच्या तीन पाल्यांना अनुक्रमे रूपये २०००, १५००, १००० अशी बक्षिसे देण्यात येतील. |
| गट क्र. ५ - १२ वी (H.S.C.) | प्रथम प्रयत्नात उत्तीर्ण झालेल्या व गुणानुक्रमे सर्वप्रथम येणाऱ्या मागासवर्गीय सभासदांच्या तीन पाल्यांना अनुक्रमे रूपये २०००, १५००, १००० अशी बक्षिसे देण्यात येतील. |
| गट क्र. ६ - १० वी (S.S.C.) | प्रथम प्रयत्नात उत्तीर्ण झालेल्या व गुणानुक्रमे सर्वप्रथम येणाऱ्या वर्ग १ ते ३ मधील सभासदांच्या तीन पाल्यांना अनुक्रमे रूपये २०००, १५००, १००० अशी बक्षिसे देण्यात येतील. |
| गट क्र. ७ - १० वी (S.S.C.) | प्रथम प्रयत्नात उत्तीर्ण झालेल्या व गुणानुक्रमे सर्वप्रथम येणाऱ्या वर्ग ४ मधील सभासदांच्या तीन पाल्यांना अनुक्रमे रूपये २०००, १५००, १००० अशी बक्षिसे देण्यात येतील. |
| गट क्र. ८ - १० वी (S.S.C.) | प्रथम प्रयत्नात उत्तीर्ण झालेल्या व गुणानुक्रमे सर्वप्रथम येणाऱ्या मागासवर्गीय सभासदांच्या तीन पाल्यांना अनुक्रमे रूपये २०००, १५००, १००० अशी बक्षिसे देण्यात येतील. |
| गट क्र. ९ | पदवी/ पदव्युत्तर परीक्षेत गुणानुक्रमे येणाऱ्या तीन सेवक सभासदास अनुक्रमे रूपये २०००, १५००, १००० अशी बक्षिसे देण्यात येतील. |
| गट क्र. १० | विशेष प्राविण्य म्हणजे MPSC, UPSC स्पर्धात्मक यासारख्या शासकीय परीक्षा उत्तीर्ण होणाऱ्या किंवा क्रिडा क्षेत्रात राज्य किंवा राष्ट्रीय पातळीवरील बक्षिस मिळणाऱ्या खेळाडू सभासद व त्यांच्या पाल्यांसाठी बक्षिस रूपये. २०००/- |
| गट क्र. ११ | विशेष प्राविण्य परीक्षेत उत्तीर्ण सभासदांना बक्षिस रूपये २०००/-. विशेष प्राविण्य म्हणजे M.Phil/Ph.D. NET/SET. |

सबब, सर्व संबंधितांनी आपल्या पाल्यांचे/आपले अर्ज विहित नमुन्यात साक्षांकित प्रमाणपत्रासह दिनांक ३० ऑक्टोबर, २०२२ पूर्वी श्री. उदय खेडकर, कार्यालयीन सहाय्यक, रूम नंबर, ३१९, महाविद्यालये व विद्यापीठ विकास विभाग यांचेकडे आणून द्यावेत.

सर्व विभागप्रमुख व अधिविभागप्रमुखांना विनंती करण्यात येते की, त्यांनी सदरची योजना आपल्या विभाग व अधिविभागातील सर्व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या निर्दशनास आणावी.

दिनांक – ०५/१०/२०२२

सचिव,
शिवाजी विद्यापीठ प्रशासकीय
सेवक कल्याण निधी योजना
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

सोबत – विहित अर्जाचा नमुना

# नमुना अर्ज

प्रति,
मा. अध्यक्ष,
शिवाजी विद्यापीठ प्रशासकीय सेवक कल्याण निधी योजना,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

**विषय – कल्याण निधीतून सभासद/पाल्यांना मिळणाऱ्या बक्षिसांबाबत.**

महोदय,

मी शिवाजी विद्यापीठ प्रशासकीय कर्मचारी कल्याण निधी योजनेचा सभासद असून मी/माझा मुलगा/माझी मुलगी ------------------------------------------------------- हा /ही सन २०२१-२०२२ या शैक्षणिक वर्षात झालेल्या ---------------------------- परीक्षेत ------------ टक्के गुण मिळवून प्रथम प्रयत्नात उत्तीर्ण झाला/झाली/झालो/झाले आहे.

तरी परिपत्रकान्वये माझा/माझ्या पाल्याचा बक्षिसासाठी विचार व्हावा ही नम्र विनंती. सोबत गुणपत्रकाची/ मागासवर्गीय प्रमाणपत्राची / विशेष प्राविण्य प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत जोडली आहे. कल्याण निधी बक्षिस वाटप समितीने घेतलेला निर्णय माझ्यावर व माझ्या पाल्यावर बंधनकारक राहील.

कळावे,

आपला/आपली विश्वासू,

सभासद कर्मचाऱ्याची सही

सभासद कर्मचाऱ्याचे नाव - --------------------------------------------------

मोबाईल क्रमांक - --------------------------------------------------

पदनाम - --------------------------- वर्ग क्रमांक - --------------------

विभाग - --------------------------- बक्षिस गटवारी क्रमांक - ---------------